आरएनआय रजि नं. MAHMAR/2011/40781 पोष्ट परवाना No.G/NMD/128/2012-14

# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष ४ थे. अंक ७ वा. नवी मुंबई दिनांक १ ते ३१ जानेवारी २०१५ पाने ८ किंमत २० रूपये

## अनिधिकृत बांधकामाला माहिती अधिकाराचा सुरुंग

## भ्रष्ट अधिकारी - बिल्डरांना दाखवा बिनभाड्याचा तुरुंग !

## घर किंवा प्लॉट घेताना

## दहा गोष्टी तपासून घ्या



## आरटीआयचा पडला दणका,भ्रष्टाचार्यांचा तूटला मणका !




## माहिती अधिकारात माहिती न दिल्याने

## ५१० अधिकाऱ्यांना ५६ लाखांचा दंड !

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक **नागरिक अधिकार**

**सुभाष बसवेकर**
● संपादक ●
**गणेश काजळे-पाटील**
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी

रामशंकर सरोज (मुंबई)
गौतम गायकवाड (नवी मुंबई)
देविदास चौथमल (औरंगाबाद)
भगवान वाहूळे (पूणे)
हरिभाऊ माटेटवार (नागपूर)
सुशांत चोणकर (रायगड)
अभिजित पटवा (कोल्हापूर)
प्रीतम यादव (सातारा)
संभाजी सावंत (सांगली)
इब्राहिम पठाण (औरंगाबाद)
मोतीराम काळे (नांदेड)
स.अहमद स.अली अन्सारी(परभणी)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : **नागरिक अधिकार**
प्लॉट नं. डी-२२ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com

: web site :
rtimahasangh.weebly.com

## संपादकीय...........

# महाराष्ट्र लोक सेवा हमी कायदा येतोय ?

देवेंद्र फडणवीस सरकार सत्तेत आल्याबरोबर त्यांनी महाराष्ट्रात लोकसेवा हमी विधेयक आणण्याची घोषणा केली होती.हिवाळी अधिवेशनात हा कायदा मंजूर करुन शासन तो लागू करेल अशी आशा होती.परंतु शासनाची आणि मुख्यमंत्री यांची इच्छाशक्ती कमी पडली.आणि नव्या वर्षात जानेवारी महिन्यात शासनाने महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर सदर महाराष्ट्र लोकसेवा हमी अधिनियम २०१५ चे विधेयक जनतेसमोर ठेवले असून त्यावर जनतेच्या सूचना व अभिप्राय द्यावेत हाच उद्देश असावा.सेवा हमी मंजूर होऊन लागू कशी होणार याची काहीही हमी नाही.

महाराष्ट्र शासनांच्या विविध सरकारी कार्यालयातून जनतेची विविध कामे,विविध नोंदणी दाखले,विविध परवाने मिळत असतात.एकूणच सरकारी कार्यालये ही जनतेच्या सोई सुविधासाठी असतात.परंतु सरकारी काम आणि सहा महिने थांब अशीच सर्वत्र अवस्था दिसते आहे. आता सेवा हमी कायद्यानुसार एक ठराविक कालावधीत ठराविक कामे सरकारी स्थरावर पूर्ण होऊन कालबद्ध पद्धतीने सेवा जनतेला मिळतील याची हमी या कायदयाद्वारे मिळणार असल्याचा दावा शासन करीत आहे.या विधेयकाचा संकेतस्थळावरील मसुदा वाचल्यानंतर हा कायदा फार क्रांतीकारी आहे असे वाटत नाही. एक मीळमिळीत व दात नसलेला कागदी वाघ या कायद्यायाच्या रूपाने उभा करण्याचा आणि शासनाचा प्रयत्न असून श्रेय तर घ्यायचे परंत जनतेच्या पदरात काही द्यायचे नाही.ही जूनीच शासनाची नीती फडणवीस सरकार पुढे चालवत आहे असेच हे विधेयक वाचल्यानंतर वाटते.

सेवा न पुरविल्याबद्दल कसूरदार सरकारी अधिकारी यांना जबर दंडाची रक्कम असल्याशिवाय कर्मचारी अधिकारी कामेच करणार नाहीत.या विधेयकात कोठेच दंडाची रक्कम किती असेल याचा स्पष्ट उल्लेख नाही.तसेच सेवा न पुरविल्याबद्दल व्यथीत होऊन अपिल करण्यासाठी त्याच खात्यातील वरिष्ठ अधिकारी अपिलीय अधिकारी असतील.आपल्याच कार्यालयातील कनिष्ठांना साभाळून घ्यायचे काम हे वरिष्ठ करतील आणि नागरिकांच्या तोंडाला पुन्हा पाने पुसतील.एका खात्यातील सेवा पुरविण्यात कसुरदार ठरलेल्या सरकारी अधिकाऱ्यांच्या विरोधात त्या खात्याचा संबंध नसलेल्या दुसऱ्या खात्यातील वरिष्ठ अधिकारी हा अपिलीय अधिकारी असला पाहिजे.तसेच दंडाची रंक्कम ही सरकारी कर्मचारी यांना सेवा न पुरविल्यास भीती वाटावी इतकी असली पाहिजे.असे होणार नसेल तर ग्राहक सरंक्षण हक्क कायदा १९८६ आणि माहिती अधिकार कायदा २००५ हे जसे सरकारी अनिच्छेचे बळी ठरले आहेत तसेच नव्या कायद्याचे होईल.सेवेचा कायदा मिळाला पण सेवेचा वायदा व फायदा मिळेल की नाही ही शंका पुन्हा उरतेच !

# अनिधिकृत बांधकामाला माहिती अधिकाराचा सुरुंग

# भ्रष्ट अधिकारी - बिल्डरांना दाखवा बिनभाड्याचा तुरुंग !



मुंबईत एका बिल्डरने कॅम्पाकोला नावाचे इमारत संकूल बांधले. या संकूलातील काही इमारतीना महापालिका बांधकाम विभागाने इमारतीचा मंजूर बांधकाम आराखडा हा ९ मजल्याचा होता परंतु बिल्डरांनी प्रत्यक्षा १९ मजल्यांची भव्य इमारती बांधल्या.गरजेपाटी एकाद्या सामान्य माणसाने आपल्या घरातील एकादी रूम किंवा एकादा कोपरा जरी वाढविला तरी नोटीस पाठविणारे महापालका अधिकारी १९ मजले चढे पर्यंत बेशुद्ध राहिले यावरून त्यांना किती मोठया प्रमाणातील खुराकाचा क्लोराफॉर्म बिल्डरांनी हुंगायला दिला असेल याची आपण कल्पनाच न केलेली बरी. अशा अनेक कॅम्पाकोला मुंबई पुणे नागपूर अशा मोठया शहरात मूळ धरून उभ्या आहेत.जागेचे अतिक्रमण करायचे थातूर मातूर बिल्डींग बांधायच्या सर्व समान्य लोकांना घराचे स्वप्न दाखवायचे गरीबांच्या कष्टांचा पैशावर डल्ला मारायचा आणि अशा दर्जाहिन बांधकामाच्या इमारती धडाधड कोळसून शेकडो लोकांचे जीव घ्यायचे.अशी उदाहरणे काही कमी नाहीत अनाधिकृत बांधकामाचा देशाला कॅन्सर झालेला असून याचा विळखा देशभर पसरलेला आहे. देशात अमाप लोकसंख्या वाढली आहे.देशाचे नागरीकरण झपाट्याने होत आहे.घर,जमीन अशा स्थायी संपत्तीचे महत्त्व खूपच वाढले आहे.या बदलत्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी बिल्डर माफिया व भूमी माफिया नावाची नवी जमात देशभर तयार झाली आहे.मोठया महानगरापासून ते जिल्हा तालुका स्तरापर्यंत सर्वत्र अनाधिकृत बांधकामाचा सुळसुळाट झालेला आहे.हे भू माफिया भ्रष्ट प्रशासन व्यवस्थेला हाताशी धरून हे सगळे खेळ करीत आहेत. जागरूक नागरिक म्हणून आपण आपल्या भागातील अशा अनाधिकृत बांधकमचा पर्दाफाश करून सामान्य माणसांची फसवणूक टाळली पाहिजे.या करिता प्रत्येक शहरात दक्ष नागरिकांचे गट तयार करून अनाधिकृत बांधकामे होत तर नाहीत ना ? होत असतील तर ती कशी थांबवायची ? सामान्य माणसांची कशी फसवणूक टाळायची ? या विषयी विचार करून कृतिकार्यक्रम आखणे ही आज काळाचा गरज आहे.जर अनाधिकृत बांधकामविषयी जनतेला सर्तक केले पाहिजे.अशी अनाधिकृत घरे विकली



न गेली पाहिजेत अशी व्यवस्था करणे, दबाबगट वाढवून शासनाला या समस्यकडे अधिक गंभीरपणे पहायला भाग पाडणे व भ्रष्ट व्यवस्थेला विविध नागरिक आयुधांनी सरळ करणे अशा विविध कार्यपद्धती आखून हा रोग दुरूस्त करावा लागणार आहे.

# घर ,प्लॉट घेताय , या दहा गोष्टी तपासून घ्या!

आपण जे घर किंवा मोकळा प्लॉट विकत घेत आहोत.तो अनाधिकृत किंवा बोगस तर नाही ना ? याची खातर जमा करण्यासाठी जागरूक ग्राहकांनी अगोदर माहितीचा अधिकार वापरून खालील कागदपत्रांची खातरजमा केली पाहिजे.तसेच एखाद्या ठिकाणी होत असलेले बांधकाम अनाधिकृत वा बोगस तर नाही ना ? याचा शोध घेण्यासाठीही माहिती अधिकार कार्यकर्त्यांना खालील कागदपत्रे माहिती अधिकारात मागवून अनाधिकृत बांधकामे चव्हाटयावर आणता येतील.

१) जिल्हाधिकारी यांची अकृषिक परवानगी :-आपण ज्या भूखंडावरील घर किंवा भूखंड घेत आहोत त्यांचा जिल्हाधिकारी किंवा योग्य त्या सक्षम अधिकारी यांच्याकडून अकृषी परवाना घेतला आहे काय ? याची माहितीचा अधिकार वापरून खातरजमा करता येईल.

२) भूखंडाचे सातबाराचे उतारे तसेच फेरफाराचे उतारे काळजीपूर्वक पाहावेत त्याच्या छायाप्रति मागवून घ्याव्यात

३) जमीनीचा मूळ मालक किंवा सद्याचा भूखंडधारक आणि विकासक बांधकाम व्यावसायीक यांच्यात प्रॉपर्टी रजिस्टार यांच्यासमोर झालेले खरेदीखत,साइे करार, पॉवर ऑफ अॅटर्नी इत्यादी कायदेशीर नोंदणीकृत दस्तऐवज यांच्या छायाप्रतीची पाहणी व पडताळणी करावी.

४) सदर इमारत वा भूखंड टाऊनशीप प्लॉनिंग वा अन्य बांधकाम प्रकारत येत असल्यास त्यासंबधीची कागदपत्र तपासणी करावी तसेच तज्ज्ञांचा अभिप्राय घ्यावा.

५) बांधकाम परवाना :- गावात घर बांधण्यासाठी ग्रामपंचायत व शहरात घर वा इमारत बांधण्यासाठी नगरपालिका महानगरपालिका यांच्या बांधकाम विभागाचा बांधकाम परवाना घ्यावा लागतो. असा परवाना न घेता बांधकाम होत असल्यास ते अनाधिकृत ठरते. जेथे गाव किंवा शहर अशी हद्द नसते तेथे संबंधति जिल्हाचे जिल्हाधिकारी यांच्या कडून बांधकाम परवाना घ्यावा लागतो.

६) बांधकाम आराखडा :-गावपातळीवर ग्रामपंचायतीकडून किंवा विशेषप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालय नियंत्रित नगररचना विभागाकडून मोठया शहरात नगारपालिका,महानगरपालिका अशा स्थानिक स्वराज संस्थांच्या नगररचना विभागा कडून वास्तू विशारदांनी बनविलेला बांधकामाचा आराखडा (Plan) मंजूर करून घ्यावा लागतो.या मध्ये संपूर्ण इमारतीचा व प्रत्येक मजल्याचा आराखडा (floor plan and lay outs) मंजूर करण्यापूर्वी त्यात सोयी सुविधा सुरक्षिततेचा व सुरक्षेचा विचार केलेला असतो.मंजूरआरखडया प्रमाणेच बांधकाम करणे बंधनकारक असते.आरखडया प्रमाणे बांधकाम न करणे हे अनाधिकृत बांधकाम या व्याखेत मोडते.

७) महापालिका व पालिका क्षेत्रात मंजूर आराखड्यानुसार बांधकाम सुरू करण्यासाठी सक्षम अधिकारी यांच्याकडून बांधकाम सुरू करण्याचा दाखला (Commencement Certificate) मिळविणे आवश्यक असते.

८) इमारतीचे बेसमेंट लेवल पर्यंत बांधकाम झाल्यानंतर स्थानिक स्वराज संस्थेच्या सक्षम अभियंता यांचे बेसमेंट व्हेरि फिकेशन सर्टिफिकेट घेणे आवश्यक असते.

९) इमारत बांधून पूर्ण झाल्यावर बांधकाम पूर्ण झाल्याचा दाखला (Completion Certificate)मिळविणे गरजेचे असते.

१०) इमारतीमध्ये सर्व सुविधासंपन्न असून राहण्यायोग्य असल्याचा दाखला (Occupation Certificate) मिळविणे आवश्यक असते.

गुण किंवा दोष हे सह कुटुंब सह परिवार येऊन कार्यसिद्धी करीत असतात. विनोबा

# घराचे / इमारतीचे बांधकाम अधिकृत आहे की अनाधिकृत हे तपासण्यासाठीचा नमूना

## केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज

## (जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती अधिकारी,

----------------------

ग्रामपंचायत /नगर परिषद / पालिका/महानगरपालिका

----------------------

१) अर्जदाराचे नांव - -----------------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता : -----------------------------------------------------

३) माहितीचा विषय : ---------------- या भूखंड क्रमांक / चतूर्सिमा असलेल्या घर / इमारतीच्या बांधकाम परवाना विषयक खालील बाबीचा माहिति अधिकारात माहिती मिळणेबाबत

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (सुरूवाती पासून)

अ) उपरोक्त उल्लेखीत इमारत / हौसिंग सोसायटीच्या सदर भूखंडावर इमारत बांधताना सक्षम अधिकारी यांनी संमत केलेले इमारतीचे आराखडे ( Floor Plans and Lay outs ) प्लॉन मिळावेत व प्लॉन मंजूरीसाठी सादर केलेल्या फाईलमधील सर्व कागदपत्राच्या झेरॉक्स कॉपीज मिळाव्यात.

ब) सदर सोसायटीच्या भूखंडावर इमारत बांधण्यासाठी सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या Commencement Cirtificate ची झेरॉक्स प्रत मिळावी

क ) सदर इमारत बांधकाम करताना बेंसमेंट तपासणी झालेला सक्षम अधिकारी यांचा दाखला ची झेरॉक्स प्रत मिळावी.

ड) सदर सोसायटीची इमारत पूर्ण झाल्यानंतर दिले गेलेले Completion Cirtificate इमारत राहण्योग्य असल्याबाबत दिलेल्या Occupetion Cirtificate च्या झेरॉक्स कॉपीज मिळाव्यात.

५ ) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : <u>माहिती व्यक्तीश: टपालाने पाठवावी.</u>

६ ) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण : --------------

(--------------------)

दिनांक : ---------------

------------------------------



राज्य माहिती आयोग वार्षिक अहवाल २०१३

# माहिती अधिकारात माहिती न दिल्याने ५१० अधिकाऱ्यांना ५६ लाखांचा दंड !

# आरटीआयचा पडला दणका,भ्रष्टाचार्यांचा तूटला मणका !

माहितीचा अधिकार वापरणारे महाराष्ट्र हे देशातील प्रथम क्रमांकाचे राज्य नेहमीच राहिलेले आहे.माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ च्या पोटकलम १ अन्वये नागरिकांचे माहिती मिळण्यासाठीचे महाराष्ट्रातील सर्व जनमाहिती अधिकारी यांच्याकडे १जानेवारी २०१३ ते ३१ डिसेंबर २०१३ या काळात एकूण ७ लाख ५१ हजार १९०इतके अर्ज केले गेले.यात नगरविकास विभाग यांच्यकडे २ लाख ४३ हजार तर महसूल व वन विभागकडे १ लाख ३० इतके लक्षणीस अर्ज केले गेले होते. सन २०१३ या वर्षात एकूण ७,५१,१९० अर्जापैकी ७,४७,५०५ अर्ज निकाली काढण्यात आले.जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती न दिल्याने व सामाधानकारक माहिती न दिल्याने २०१३ मध्ये माहिती आयुक्तांच्या सर्व खंडपीठाकडे मिळून एकूण ३५४७५ अपिले करण्यात आली. माहितीचा अधिकार अधिनियम २००५कायदा वापरून माहिती मिळविणारे सर्वाधिक जागरूक नागरिक हे महाराष्ट्रात आहेत. २००५ पासून महाराष्ट्र हे माहिती अधिकार कायदा राबविण्यात अग्रेसर आहे.

सन २०१३ या वर्षात माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळविण्यासाठी अर्ज करूनही माहिती न देणाऱ्या एकूण ५१० कसूरदार अधिकारी कर्मचाऱ्यांना एकूण ५६ लाख ऐंशी हजार इतका दंड करण्यात आला.दंड झालेले हे अधिकारी उपजिल्हाधिकारी,तहसीलदार,नायब तहसीलदार,वन अधिकारी,नगरपालिका व महानगरपालिका अधिकारी,विद्यापीठ अधिकारी गट विस्तार अधिकारी,विस्तार अधिकारी,ग्रामसवेक व तलाठी आदी प्रवर्गातील आहेत.बहुतेक अधिकारी व कर्मचारी यांना कायद्यानुसार सदर दंड हा आपल्या पगारातून भरावा लागणार आहे.
२०१३ या वर्षात नाशिक माहिती आयोग खंडपीठाचे माहिती आयुक्त यांनी सर्वाधिक म्हणेज २०३ कसुरदार शासकीय आधिकारी यांच्यावर एकूण १५ लाख ७९ हजार ७५० रूपयांची शास्ती लावली तर माहिती आयोग नागपूर खंडपीठाचे माहिती आयुक्त यांनी केवळ ८ प्रकरणात एकूण ८० हजार रुपयांची शास्ती लावली आहे. माहिती आयोगाच्या सर्व खंडपीठाकडे विचारात घेतलेल्या सर्व सुनावन्या व शास्ती वा दंड झालेल्या सुनावन्या यांचे प्रमाण पाहता वर्षभरात प्रत्येक शंभर सुनावण्यामागे जास्तीतजास्त दोन सुनावणी प्रकरणात कसूरदार जनमाहिती अधिकारी यांना दंड व शास्ती लावली गेली आहे.हे प्रमाण फारच कमी आहे.जर अपिलार्थीने अपिल करूनही कसूरदार जनमाहिती अधिकारी यांना दंड वा शास्ती लागण्याचे प्रमाण असेच कमी राहिले तर माहिती नाकरण्याचे प्रमाण वाढेन व परिणामी दुसऱ्या अपिलांची संख्या वाढत जाईल हे चिंताजनक आहे.

संकलन : गौतम गायकवाड,नवी मुंबई

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.डी-२२, सेक्टर- १२ खारघर, नवी मुंबई -४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ------------------------------------------------------------

पत्ता :-----------------------------------------------------------

-------------------------------- पीनकोड

मोबाईल :

ई मेल :---------------------

शिक्षण : ----------------------- जन्मदिनांक ------------------------------

व्यवसाय :--------------------- येणाऱ्या भाषा : ------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे : ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /------------------------------------

मी प्रतिज्ञापूर्वक आणि विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी ओळखपत्र खर्च २०० रूपये पोष्टेज खर्च १०० रूपये आणि २०० रूपयांची तीन पुस्तक व स्थानिक शाखा शुल्क १०० रूपये असे एकत्रीत ६०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व नागरिक अधिकार विषयक पुस्तके मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावीत.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीनृ तसेच माहिती अधिकार महासंघाच्या कार्यकर्ता आचारसंहितेचे काटेकोर पालन करीन.कोणतेही बेकायदेशीर कृत्य करणार नाही. आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : ------------- सही

सभासद कोड नंबर

## कार्यालयीन उपयोगासाठी

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक / / २०१५ मुदत समाप्तीचा दिनांक / / २०१६
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- सभासद प्रक्रिया शुल्क मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली

**आपण वेबसाईट rtimahasangh.weebly.com वरूनही ऑनलाईन फार्म भरू शकता**

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते ,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार जागरूक नागरिक यांच्याकडून - शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ** प्लॉट नं.डी-२२, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१० या पत्यावर पाठवावा. ओळखपत्र खर्च / पोष्टेज व नागरिक अधिकार प्रकाशनांची तीन पुस्तके असे एकत्रीत मुल्य ६०० रूपये स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून खाते नंबर **32619447406** स्वराज बहुउद्देशिय संस्था,खारघर नवी मुंबई या नावाने भरावेत..बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर सभासद ओळखपत्र व पुस्तके पाठवली जातील.सभासदांना महासंघाच्या वेबसाईडवरून **web site : rtimahasangh.weebly.com** ऑनलाईन फार्म भरता येईल.या अंकात पान ७ वर दिलेला सभासद फॉर्म झेरॉक्स करून सविस्तर भरून फोटो चिकटवून तो सायबर कॅफेमधून स्कॅन करूनही **mediamansubhash@gmail.com** या ई मेलवरूनही पाठविल्यास अधिक सोईचे होईल.तरी जास्तीत जास्त माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी सभासद व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

पोष्ट परवाना. No.G/NMD/128/2012-14

प्रति,

पाठविणार
पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-१६, सेक्टर -१२ खारघर
नवी मुंबई ४१०२१०
महाराष्ट्र
मो ९२२३५१६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले. रजि नं. MAHMAR/2011/40781